**ठळक बातम्या**

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीसंदर्भात शासन निर्णय जारी, उपोषण सोडत आंदोलन मागं घेतल्याची मनोज जरांगे यांची घोषणा

आंदोलकांना नियंत्रित करण्यात सरकारनं हलगर्जीपणा केल्याबद्दल उच्च न्यायालयाकडून नाराजी व्यक्त

सेमिकॉन इंडिया २०२५ चं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, भारताची मायक्रोचीप जगाला दिशा देईल असा व्यक्त केला विश्वास

**आणि**

हा संपूर्ण आठवडा राज्यातल्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><>**

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझिटियरची अमलबजावणी करण्याचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. त्यानंतर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी उपोषण सोडलं, आणि गेले पाच दिवस मुंबईत सुरू असलेलं आंदोलन मागं घेत असल्याची घोषणा केली. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर दोन महिन्यात काढण्यासाठी दोन महिन्याची मुदत सरकारनं मागितली आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची आझाद मैदानावर भेट घेऊन त्यांना हैदराबाद गॅझिटियरबाबत शासनानं तयार केलेला मसुदा दाखवला. सातारा आणि औंध गॅझिटियरची अंमलबजावणी करण्याबाबत कायदेशीर बाबी तपासून लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल असं त्यांनी सांगितलं. मराठा आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया महिना अखेरपर्यंत पूर्ण केली जाईल, मुंबईत आंदोलकांच्या वाहनांवर लावलेला दंड मागे घेतला जाईल, आरक्षण आंदोलनात मरण पावलेल्यांच्या वारसांना सरकारी महाममंडळात नोकरी दिली जाईल, तसंच मृतांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जाईल, असं आश्वासनही सरकारनं दिलं. जात प्रमाणपत्र

पडताळणीची कार्यवाही अर्ज दाखल झाल्यापासून ३ महिन्यात पूर्ण करण्याचं आश्वासनही सरकारनं दिलं.

त्यानंतर आंदोलकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि गुलाल उधळत जल्लोष केला. मराठा समाजाच्या हिताचा तोडगा निघाल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केली.

**<><><><>**

हैदराबाद गॅझिटियरच्या अंमलबजावणीचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. त्यानुसार मराठा समाजातल्या, जमिनीच्या मालकीचा पुरावा नसणाऱ्या व्यक्तिंना, प्रतिज्ञापत्र सादर करावं लागेल. १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वी या भागात राहत असल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद करावं लागेल. त्या आधारे सक्षम अधिकारी स्थानिक चौकशी करुन खातरजमा करतील. त्यात प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्या व्यक्तीच्या नातेसंबंधातल्या कुणाला कुणबी प्रमाणपत्र मिळालं असेल तर आणि प्रतिज्ञापत्र सादर करणारी व्यक्ती ही प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तीच्या कुळातली असल्याचं प्रतिज्ञापत्र कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या व्यक्तीला द्यावं लागेल. या प्रमाणपत्राची तपासणी ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी यांची समिती, वंशावळ समितीच्या सहाय्यानं करेल. त्यानंतर मराठा समाजातल्या व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र दिलं जाईल, असं या आदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांना सरकारनं बळाचा वापर करून हटवायला हवं होतं, अस मत मुंबई उच्च न्यायालयानं आज व्यक्त केलं. या आंदोलनामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबतच्या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सरकारनं काय पावलं उचलली, ते न्यायालयाला सांगावं, असे निर्देश खंडपीठानं सकाळच्या सत्रात दिले होते. तसंच जरांगे यांना तत्काळ आझाद मैदान सोडायचे आदेशही दिले होते. सुनावणीला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर, काही आंदोलक न्यायालयाच्या आदेशाचं पालन करत आहेत, मात्र काहीजण पोलिसांचं ऐकत नसल्याचं महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला सांगितलं.

नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी सरकारनं जरांगे यांना नोटिस बजावली असून त्यांनी सांगितल्यावरच लोक ऐकतील, असंही त्यांनी नमूद केलं. यावर, तुम्ही त्यांच्या लोकप्रियतेवर अवलंबून आहात का? तुम्ही आमच्या आदेशांचं पालन का करू शकत नाही? आंदोलकांची संख्या पाच हजारावरून एक लाखापेक्षा जास्त झाल्याचं तुम्ही कोर्टाच्या निदर्शनाला का आणून दिलं नाही? असे प्रश्न न्यायालयानं विचारले.

<><><>

मराठा आरक्षण आंदोलकांच्या मागण्यांवर कायदेशीर निकषांवर टिकेल असा तोडगा काढण्यात यश आल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाधान व्यक्त केलं आहे. मंत्रीमंड़ळ उपसमितीच्या प्रयत्नांमुळं हे यश मिळाल्याचं ते म्हणाले. या आंदोलनामुळं मुंबईकरांना झालेल्या त्रासाबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली.

ओबीसींचं आरक्षण काढून कोणालाही सरकारनं आरक्षण दिलेलं नाही, त्यामुळं त्यांनीही साखळी उपोषण मागे घ्यावं, असं आवाहन त्यांनी केली.

<><><>

राज्य सरकारनं एसटी, अर्थात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातल्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर त्वरित वापर करायला मान्यता दिली आहे. त्यामुळे महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य साधण्यात मदत होईल, असं परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

सरकारच्या सुधारित धोरणानुसार, एसटीच्या अतिरिक्त जमिनींचा विकास PPP, अर्थात सार्वजनिक-खाजगी सहभाग पद्धतीनं केला जाणार आहे. त्यासाठीची भाडेपट्टा कालमर्यादा ४९ वर्षे, अधिक ४९ वर्षे, अशी एकूण ९८ वर्षे इतकी असेल. या कालावधीत संबंधित जमिनींचा व्यापारी वापर करून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा एसटी महामंडळाला जमा करणं बंधनकारक असेल.

या निर्णयामुळे महामंडळाच्या ताब्यातली निष्क्रिय जमीन वापरात येईल, नव्या प्रकल्पांना चालना मिळेल, तसंच एस.टी. महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाल्यामुळे प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरवता येईईल, असं  सरनाईक म्हणाले.

<><><>

केंद्रीय आयुष  मंत्रालयानं आरोग्य सेवा क्षमता बांधणीसाठी येत्या ३ आणि ४ सप्टेंबरला दिल्लीत एक शिखर परिषद आयोजित केली आहे.  केंद्रीय आयुष तथा आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज त्याबाबत माहिती दिली. आयुर्वेद,  योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्धसेवा यासह होमिओपॅथी चिकित्सा पद्धतीला एकत्र आणून समग्र आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणं हा या परिषदेमागचा प्रमुख उद्देश आहे.

**<><><><>**

भारत एक मजबूत सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करत आहे ज्यामुळे देश  जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि स्वावलंबी होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं आज सेमिकॉन इंडिया २०२५चं उद्घाटन करतानान ते बोलत होते. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी जग भारतावर विश्वास ठेवत असल्याचं ते म्हणाले. जागतिक चिप बाजारपेठेत भारताच्या वाढत्या प्रभावावर त्यांनी भर दिला. २१ व्या शतकात, या लहान चिप्समध्ये मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले.

**- होल्ड बाईट मोदी- -**

येत्या काही वर्षांत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज आहे, आणि भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं ते म्हणाले.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी उपस्थित होते. देशात पाच सेमिकंडक्टर युनिट्सचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. काही महिन्यांत आणखी दोन युनिट्द्वारे उत्पादन सुरू होईलं असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात आज गौरी-गणपतींना निरोप दिला जात आहे. आज १ लाख १ हजार ३२९ घरगुती आणि १६ सार्वजनिक गणपतींचं विसर्जन होत आहे. रत्नागिरी शहरातल्या भाट्ये आणि मांडवी समुद्रकिनारी गर्दी असून, रत्नागिरी नगरपालिकेने माळनाका इथं एक कृत्रिम तलावही उभारला आहे. निर्माल्य संकलनासाठी मांडवीत कलशही ठेवण्यात आला आहे.

**<><><><>**

काल संध्याकाळपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झालं आहे. जिल्ह्यातले अनेक नद्या नाले तुडुंब भरून वाहत असून काही

ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं आहे. जिल्ह्याच्या काही भागात आज सकाळपासून पावसाचा ओघ पुन्हा वाढला, त्यामुळे इरई धरणातल्या पाण्याची पातळी वाढली आहे. या धरणाचे तीन दरवाजे एक मीटरनं, तर चार दरवाजे पाऊण मीटरनं उघडून विसर्ग सुरू केला आहे.

**<><><>**

अमरावती जिल्ह्यातला अप्पर वर्धा जलाशयातला पाणीसाठा ९५ पूर्णांक ७९ टक्के इतक्या क्षमतेपर्यंत पोहोचल्यामुळे पाण्याचा विसर्ग वाढवला आहे. सध्या अप्पर वर्धा धरणाचे १३ दरवाजे ५०९ घनमीटर प्रतिसेकंद इतका विसर्ग करण्यात येत आहे. हा विसर्ग वर्धा नदीपात्रात सोडला जात असल्यानं नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचं आवाहन उर्ध्व वर्धा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षानं केलं आहे.

**<><><>**

सिंधुदुर्ग सागरी किनारपट्टीवर मालवण समुद्रात परराज्यातल्या हायस्पीड नौकानी घुसखोरी केल्याचं आढळून आलं आहे. या नौकांवर कारवाई करण्याचे निर्देश मत्स्य आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी दिले आहेत. त्यानुसार सागरी कायद्याअंतर्गत कठोर कारवाईसाठी मत्स्यव्यवसाय विभाग सज्ज असून कार्यवाही सुरु असल्याचं मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त  सागर कुसवेकर यांनी सांगितलं.

**<><><>**

नागपूर इथल्या मेट्रो सेवेनं ऐतिहासिक टप्पा गाठला असून कामठी महामार्गावरच्या मेट्रोची जगातली सर्वात लांब मेट्रो डबल डेकर वायाडक्ट म्हणून गिनिस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर इथल्या शासकीय निवासस्थानी या विक्रमाचं प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. त्यावेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**<><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या सारूळ गावात जिलेटीन स्फोटकाचा साठा आढळून आला. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. यात ६ हजार १२५ जिलेटीन कांड्या, २ हजार २०० डेटोनेटर, दीडशे मीटर डी एफ वायर असा ९५ हजार ७५० किमतीचा साठा जप्त केला आहे.

**<><><>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानात कंत्राटी तत्त्वावर काम करणारे कर्मचारी विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. जुलै महिन्यात त्यांनी केलेल्या मागण्या अद्याप पूर्ण न झाल्यामुळे गोंदिया जिल्ह्यातल्या साडेसातशेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी १५ दिवसांपासून पुन्हा एकदा बेमुदत धरणं आंदोलन सुरू केलं आहे. धुळ्यातही हे कर्मचारी १९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर आहेत. मात्र अद्याप त्यांच्या मागण्यांची दखल न घेतल्यामुळे आज त्यांनी थाळीनाद आंदोलन करून सरकारचं लक्ष वेधायचा प्रयत्न केला.

**<><><><>**

नाॅर्वेतल्या ऑस्लो इथं २३ ते ३० ऑगस्ट या कालावधीत होमलेस वर्ल्ड कप २०२५ संपन्न झाला.  या स्पर्धेत जगभरातल्या ४० पुरुष आणि २४  महिला संघांनी भाग घेतला. या स्पर्धेत नागपूरच्या पुरुष संघानं १५ वं, तर महिला संघानं ८ वं स्थान मिळवलं.

**<><><><>**

हा संपूर्ण आठवडा राज्यातल्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या संपूर्ण काळात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची, तसंच किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडेल. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**